FORM-1 A

N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला०प्र०वि, पहिली खबर क्र. FIR No. 21/19, वर्ष Year ..., दिनांक Date 13/06/19

2. (i) अधिनियम Act ... कलमे Sections ...
(ii) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम Sections - 7 (सुधारणा - 2018)
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना: वार Occurrence of offence: Day सोमवार तारीख पासून Date from 13/05/2019 वेळ Time ... तारीखे पर्यंत Date to 13/06/19 वेळ Time 10:35 वा.
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 13/05/2019, वेळ Time ...
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No. 09/19, तारीख Date 13/06/19 वेळ Time 10:35 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: ✓ लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name जे. जे. मार्ग पोलिस ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any ... गल्ली Ward मुंबई, रस्त्याचे नाव Name of road ...
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. ..., राज्य State ...
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री. इम्रान (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name हनिफ खान
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 39 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9833319980
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ... दिल्याचा दिनांक Date of Issue ... दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation ...
(g) धर्म Religion ..., जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता: Address: रुम नंबर 814, पटेल म्हाडा बिल्डींग, "अरब" गल्ली, गल्ली / सुर्वे नं. Ward ... घर / नाव नंबर House/Name No. ... फोन /मो. नंबर Phone/M. No. ... पॅन नं. Pan No. ... वोटर्स नं. Card No. ...
रस्त्याचे नाव Road मोतीबाग चौक, ओरिएंटल हॉटेल समोर, नागपाडा, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ... गाव Village ... पोस्ट Post ... पो. स्टे. P. Stn ...
तालुका Taluka मुंबई जिल्हा Distt. ... राज्य State ... सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

शिरीष मुरलीधर गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक
जे० जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई.

क

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

श्री० इम्रान हनिफ खान वय ३९ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा० हि० रुम नं. ४/ए, पहिला माळा, अरब गल्ली, मोतीवाला चाळ, - ओरिएंटल हॉटेल समोर, नागपाडा, मुंबई यांचा जबाब स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखीत केला असुन त्या जबाबाला सदर गुन्ह्याची प्रथम खबरी जबाब संबोधण्यात येत आहे.

समक्ष

V.Patil
13/6/19

(विनोद स. पाटील)
पोलीस निरीक्षक
खं०प्र०वि० मुंबई

(signature) 13/6/2019

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादी कडुन
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील लोकसेवक आरोपी इसमाने फिर्यादी यांचे विरुद्ध जे.जे. मार्ग पोलीस ठाणे येथे MPDA ची कारवाई न करण्यासाठी फिर्यादीकडे रुपये 2 लाखाची (दोन लाखाची) लाचेची रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणून लोकसेवक आरोपी यांचे विरुद्ध भ्र.प्र.अधि. 1988 (सुधारणा) 2018 चे कलम - 7 अन्वये गुन्हा नोंद आहे.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
विनोद सर्जेराव पाटील, पोलीस निरीक्षक.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..........., जिल्हा ..........., राज्य ...........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................................................ (3) Transferred to P.S ..........................................., District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)
13/6/2019

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विनोद सर्जेराव पाटील
पदनाम Rank
तपासिक अं. चा कोड. क्र. पोलीस निरीक्षक
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I.O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख. ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

फिर्यादी जबाब दिनांक १३/०६/२०१९

श्री. इम्रान हानिफ खान वय ३९ धंदा– व्यवसाय, बिल्डीग कॉन्ट्रक्टर, रा.ठि. रूम नं. ८/ए,पहिला माळा, अरब गल्ली, मोतीवाला चाळ, ओरीएंटल हॉटेल समोर, नागपाडा, मुंबई ८ मो क्र.९८३३३३१९८०

............

मी वरील प्रमाणे असुन, वर दिलेल्या पत्यावर जन्मापासुन कुंटूबियासह रहावयास आहे. माझा व्यवसाय बिल्डींग कॉन्ट्रक्टरचा असुन, सदर व्यवसाय हा नागपाडा येथे करीत आहे. सदर व्यवसायातुन मिळणा–या रक्कमेवर माझा व कुटूबियाचा उदारनिर्वाह चालतो.

माझे विरूध्द जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.३७५/१८, व गु.र.क्र.४३७/१८ असे दोन खोटे गुन्हे शिरीष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जे.जे.मार्ग पोलीस ठाणे यांनी नोंद करावयास लावले आहेत. सदर गुन्हयात मला जामीन मंजुर झालेला आहे. त्यामुळे मी जे.जे.मार्ग पो.ठाणे येथील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना मी ओळखतो.

माझेविरूध्द जे.जे.मार्ग पो.ठाणे येथे वर नमुद दाखल असलेल्या खोटया गुन्हयाच्या अनुषंगाने माझे विरुध्द जे.जे. मार्ग पोलीस ठाणे मार्फत तडीपार कारवाई केली होती. सदर तडीपार कारवाई मी कोकण भवन येथे जावून रदद केलेली आहे. माझेवर एवढा अत्याचार करून पुन्हा जे.जे.पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी मला त्यांच्या केबीन मध्ये बोलावून, माझ्या विरुध्द एम.पी.डी.ए.ची कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच एम.पी.डी.ए. ची कारवाई करावयाची नसल्यास, वपोनि श्री.गायकवाड यांनी माझ्याकडे रुपये दोन लाख (दोन पेटी) इतक्या रक्कमेची लाच म्हणून मागणी केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गायकवाड यांनी लाच म्हणून मागणी केलेली रक्कम रुपये दोन लाख (दोन पेटी) मला देण्याची इच्छा नसल्याने मी सदरची बाब आमच्या विभागातील समाजसेवक व माझा मित्र श्री.लतिफ शेख यांना सांगितली व त्यांच्या सल्यानुसार दिनांक १३/०५/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुबई येथे इंग्रजी भाषेत माझे स्वहस्तक्षरात लेखी तक्रार दिली.

दिनांक १३/०५/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पाटील यांनी तात्काळ दोन पंचाना समक्ष बोलावून त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज वाचण्यास दिला व मी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत खात्री झाल्यानंतर, तक्रार अर्जावर पोलीस निरीक्षक पाटील व दोन्ही पंचानी समक्ष स्वाक्षरी करुन तो दाखल करुन घेतला.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषगाने लोकसेवक जे.जे.मार्ग पोलीस ठाणेचे वपोनि श्री. गायकवाड यांचेकडून खरोखरच लाचेची मागणी होत आहे किंवा कसे याबाबत त्वरीत पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पो.नि.पाटील यांनी मला व पंचनासांगुन, पडताळणी पथकास त्याप्रमाणे योग्य ती पुढील तयारी करण्यास सांगितले. पडताळणीची पुर्व तयारी झाल्यानंतर मी, पो.नि.पाटील, दोन पंच, असे पडताळणी पथकासह दोन शासकीय वाहनातुन लाप्रवि., मुंबई कार्यालयातुन जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबईकडे रवाना झालो.

त्यानंतर मी व पो.नि पाटील तसेच पडताळणी पथक असे सफेद रंगाच्या टाटा सुमोने पोलीस वाहनातुन सातरस्ता, एस.ब्रिज ने पी.डिमेलो रोडने सहायक सुरक्षा आयुक्त, लोहमार्ग मुंबई या कार्यालयाच्या आवारात आलो. त्यानंतर पो.नि.पाटील यांनी मला व पंचना जे.जे.मार्ग पो.ठाणे येथे जावुन प्रत्यक्ष भेटुन पडताळणी करून त्यांनतर लाचेची मागणी केल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पो.नि पाटील यांनी मला सांगितले

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

की, लोकसेवक गायकवाड व माझेमध्ये झालेले प्रत्यक्ष भेटीचे सभांषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.पाटील यांनी माझे चॉकलेटी रंगाच्या पठाणी पायजमाच्या आतील बनियनला व्हाईस रेकार्डर लावला व मला पंच श्री. यादव यांचे सह जे.जे.मार्ग पो.ठाणे येथे पाठविले. त्याप्रमाणे मी पंच श्री. यादव यांचेसह जे.जे.मार्ग पोलीस ठाणे,मुंबई येथे जावून वपोनि श्री.गायकवाड यांची त्यांच्या केबीनमध्ये भेट घेतली त्यावेळी वपोनि गायकवाड यानी माझ्या बरोबर असलेले इसम कोण आहेत अशी विचारणा केली. व माझ्यबरोबर कामासंदर्भात चर्चा केली व माझ्याकडे लाचेची मागणी म्हणुन वपोनि गायकवाड यांनी मला किती आणले म्हणुन विचारले असता, आता करतो असे सांगताच व.पो.नि. गयकपवाड यांनी मला 'दो पेटी' (दोन लाख) एकटयाने घेवुन येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना इफतारी नंतर घेवुन येतो असे सांगुन, मी व पंच असे परत पोलीस वाहनाजवळ निघुन आलो व वरील घटना मी पो.नि.पाटील यांना सांगितली त्यांनी याबाबत व्हाईस रेकॉर्डर वाजवुन व पंचाना विचारुन खात्री केली. वपोनि गायकवाड यांचेकडून लाचेची मागणी झाल्याची खात्री पटल्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे सोबतच्या पथकाला योग्य ती पुर्व तयारी करण्यास सांगीतले.

व.पो.नि. यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रकमेपैकी प्रथम रु २५,०००/– देण्याचे ठरले त्याप्रमाणे मी रु ५००/– दराच्या ५० चलनी नोटा पो.नि. पाटील यांच्याकडे दिल्या. त्यानंतर पो.नि पाटील याचे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदाराने लाचेच्या रक्कमेला कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि.पाटील यांच्या सुचनेवरुन सदर भारतीय चलनी नोटांची घडी करून माझे कुर्ताच्या पुढील डाव्या खिश्यामध्ये अलगद ठेवली त्यानंतर पो.नि पाटील यांनी सापळा कारवाईचे आयोजन केले.

पो.नि पाटील यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे जे.जे.मार्ग पोलीस ठाणेतील वपोनि श्री.गायकवाड यांना लाचेची रक्कम देण्यासाठी मी पंच श्री.यादव यांचेसह गेलो असता, वपोनि गायकवाड हे बंदोबस्ताकरीता बोरी मोहल्ला येथे व्यस्त असल्याचे मला तेथील पोलीस अंमलदारामार्फत समजल्याने मी व पंच बोरी मोहल्ला येथे वपोनि गायकवाड यांना भेटण्याकरीता गेलो परंतु वपोनि गायकवाड यांनी मला पहाताच त्यांनी मला पोलीस ठाणेस भेटयला ये असे मला हाताने इशारा केल्याने मी जे.जे.मार्ग पोलीस ठाण्यात परत आलो. तेथे मी वपोनि गायकवाड यांची रात्रौ २२.०० वा.पर्यत वाट पाहिली व पुन्हा चौकशी केली असता ते परस्पर बदोबस्तावरुन घरी गेल्याचे समजले. वपोनि गायकवाड यांची भेट झाली नसल्याने पो.नि पाटील यांनी त्यादिवसाची सापळा कारवाई स्थगित करून दिनांक १४/०५/२०१९ रोजी सापळा कारवाई करण्यात येईल असे मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. व त्यानंतर मी व पोनि.पाटील तसेच सापळा पथक ब्युरो कार्यालयात परत आलो.

मी दि. १४/०५/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे हजर झाल्यानंतर पो.नि पाटील, पंच व सापळा पथक यांनी पुन्हा दिनांक १३/०५/२०१९ रोजीच्या सापळा कारवाई प्रमाणेच आजही सापळयाची पुढील कारवाई केली जाईल असे आम्हाला सांगितले.

समक्ष

VPatil
13/6/19

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

13/6/2019

त्यानंतर पो.नि.पाटील यांनी माझ्याकडे लाचेकरीता ठरलेली रक्कम आणली आहे का अशी विचारणा केल्यानंतर मी रु. २५,०००/— (रु.२०००/— दराच्या १२ चलनी नोटा व रु.५००/— दराच्या दोन चलनी नोटा) समक्ष हजर केल्यानंतर पो.नि.पाटील यांनी सदर रक्कमेच्या नोटाची कार्यालयातील झेरॉक्स मशीन वर झेरॉक्स प्रिंट कांढली त्यावर पचानी नोटांच्या नंबरची खात्री करुन पो.नि.पाटील व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर मी दिलेल्या नोटावर अॅन्थ्रासीन पावडर लावून व योग्य ती सापळापूर्व तयारी झाल्यानंतर आम्ही दोन पंचासह व सापळा पथकासह शासकीय वाहनाने सुमारे १४.०० वाजता लाप्रवि कार्यालयातुन रवाना झालो व जे.जे. मार्ग पोलीस ठाणे च्या बाजुस जवळ येवून थांबलो.

त्यानंतर पो.नि.पाटील यांनी मला व पंच श्री यादव यांना वपोनि गायकवाड यांना लाचेची रक्कम देण्याकरीता वपोनि गायकवाड यांच्या केबीनमध्ये पाठविले असता वपोनि गायकवाड यांनी सांगितले की, ते रमझान बंदोबस्तामध्ये व्यस्त असल्याने ''बाद मे आना'' असे सांगितले. त्यांनतर सापळा पथकास गायकवाड हे नमुद दिवशी लाच स्विकारणार नाही असे समजुन आल्याने पो.नि पाटील यांनी सापळा कारवाई स्थगित करून सापळा काढुन घेण्यात येत असल्याचे सांगितले.

तदनंतर वपोनि गायकवाड यांनी माझ्याकडे लाचेबाबत आजपावेतो कोणताही संपर्क केलेला नाही.व भविष्यात करणार नाही असे मला वाटले. तसेच वपोनि गायकवाड यांच्या सोबत माझी कोणत्याही प्रकारचे वैमनस्य नसुन त्याच्याबरोबर कोणताही प्रकारची आर्थीक देवान घेवान नाही.

तरी दिनांक १३/०५/२०१९ रोजी पडताळणी पंचनामा दरम्यान जे.जे.मार्ग पो.ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी माझ्यावर एम.पी.डी.ए कारवाई न करणेकरीता माझ्याकडे रूपये दोन लाख (दोन पेटीची) लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले. सदरची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने याबाबत जे.जे.र्मा पोलीस ठाणेचे वपोनि गायकवाड यांचेविरोधात कायदेशीर कारवाई होण्याकरीता तक्रार आहे.

माझा नमूद जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित करण्यात आलेला असून, तो मला हिंदीतून समजावून सांगितला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

Vपाटील 13/6/19

( विनोद पाटील )

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

13/6/2019

खरी नक्कल